
आसक्ती
the dezire
अनुस्मृती



# आसक्ती the desire

## कथा

## अनुस्मृती

## ई साहित्य प्रतिष्ठान



आसक्ती the desire

लेखिका : अनुस्मृती

संपर्क : 7710980841

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन :२४ सप्टेंबर २०१७

©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.



# आसक्ती

या कथेतील सर्व नावे, स्थळे व प्रसंग काल्पनिक आहेत.

त्यांचे कोणत्याही सत्य घटनेशी साम्य आढळून आल्यास तो केवळ योगायोग समजावा.





*In today's world we expect too many things from a person also we expect him to fulfil all of our desire assuming there are only two aspects of a story first is "Truth" and Last is "a Lie" like Black and White but what if we accept the third Aspect which lies between Truth and Lies which we called "Mistakes" which lies in grey shade*

*This story belongs to a Grey shade and I believe there are strict followers of Black and white theory so do not judge it by your thinking just see what I want you to see.*

***I don't like writing the typical kind of a love story, lies in 90's movies with a happy ending. I wanted to focus on different life aspects which are not believed to happen but its already happening. I want to write on such aspects.***



# *आसक्ती*

तशी माझी आणि अंकित ची ओळख काही फार जुनी नव्हती. अगदी तीन वर्षाआधी आम्ही भेटलो होतो. म्हणजे प्रत्यक्षात नव्हे, तर मॅट्रिमोनी website वर. आणि तिथूनच आमची ओळख झाली. तो राहायला सध्या UK मध्ये होता. म्हणून आमचं काही प्रत्यक्षात भेटणं झालंच नाही. फ़क्त त्याचे आई आणि बाबा तेवढे मला भेटून गेले. आणि लगेचच त्यांनी होकार दिला... "आम्हाला मुलगी पसंत आहे "

आहे म्हणजे?? एवढ्या लवकर? मी स्वतःशीच नवल करीत होते.

माझं नाव मिसिसिपी माझं नाव असं का ठेवण्यात आलं? मला माहित नाही. पण मला लाडाने सर्व सीपी असंच म्हणत. मी उगाच अतिहुशारीचा किंवा अतिनम्रपणाचा आव नाही आणत. पण हो, मी दिसायला सुंदर होते. आकर्षक. म्हणजे इतकी सुंदर की कोणाच्याही मनात भरण्यासारखी. फोटोजेनिक. माझे फोटो इतके सुंदर येत की ते पाहून कोणीही माझ्या प्रेमात पडेल. पण त्यांचा होकार इतका अनपेक्षित आला कि मला माझ्यावरच शंका यायला लागली म्हणजे. नाही म्हणाल



तरी आज काल विना चर्चा किंवा निदान घर बघणे ह्या गोष्टी तरी arrange marriage मध्ये चालतात. पण माझ्या बाबतीत असं मात्र झालं नव्हतं असो, तिकडे दुर्लक्ष्य करत मी होकार दिला आणि आमचं ठरलं, मग आमच्या भेटीगाठी चालू राहिल्या कधी फोन वरून, कधी Skype calling वरून किंवा कधी google video calling वरून... पण प्रत्यक्षात असं कधीच नाही. सारं व्हर्च्युअल.

आईच्या मात्र होकारातही नाराजीचा स्वर होताच, लेक आम्हाला सोडून एवढ्या दूर जाईल हे मात्र तिला साहवत नव्हतं, तेच म्हणून कि काय तिने प्रत्येक मार्गाने मला परावृत्त कारण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण दुष्ट अशी ती खासच नव्हती आणि शेवटी तिला नमतं घ्यावं लागलं.

मग काय! आता आम्हाला कोणाचीही फिकीरच नव्हती, आम्ही खूप बोलायचो, वेळ भेटेल तिथे चाट आणि video calling व्हायची. मी तर माझ्या पूर्ण दिवसाचा पाढाच त्याला वाचून दाखवायची. तेवढ्या वेळात त्यांनी माझ्या असतील नसतील तेवढ्या गोष्टी समजून घेतल्या, माझा bday, माझ्या आईचा Birthday एवढाच काय माझ्या मोबाइलला मध्ये किती apps आहेत याची सुद्धा यादी त्याच्याकडे असायची.



असं सगळं सुरळीत असताना काही तरी झालं. अगदीच अनपेक्षित असं म्हणता नाही येणार, कारण त्यालाही मीच त्याला कारणीभूत होते. माझं मॅट्रिमोनी वरचं account मी अजूनही delete केलं नव्हतं आणि फक्त थट्टा म्हणून कि काय मी तो रोज बघत होती. आणि अचानकच मला त्याची request आली. धीरजची.

धीरज म्हणजे फार तर काही खूप असा देखणा नव्हता. होता काळा सावळाच. पण तो प्रत्येक गोष्टीत खूपच ऍक्टिव्ह होता. उत्साहाने सतत फ़ुललेला. एनर्जीचा झरा. फ़व्वारा. फ़ाउंटन. पहिल्या एक दोन भेटीतच मला तो आवडला. अर्थात त्याने मला इंप्रेस करण्याचा विशेष प्रयत्न केला नाही. पण कदाचित केला असता तर मी इंप्रेस झाले नसते. त्याच्या इंप्रेस न करण्यामुळेच आता मला तो जास्त आवडू लागला. आणि योगायोग म्हणजे असा कि आम्ही दोघे पण मुंबईलाच राहत होतो.  काहीसे जवळच.



मग काय! दूरच्या व्यक्तीपेक्षा जवळची व्यक्ती जास्त निकट वाटते. ओढते. माझ्या बाबतीतही असंच झालं. माझ्या आणि धीरजच्या रोजच्या भेटीगाठी चालूच राहिल्या. आणि याच वेळात मला आता अंकित खूप दूर आणि परका वाटू लागला. आताही त्याचे रोजच phone चालूच होते. पण मला आता ते खटकू लागलं. आधी त्याच्या ज्या jokes वर मी मनमोकळेपणाने खळाळून हसायची, ते आता मात्र मला irritate व्हायला लागले. त्यानी असं काही खास माझं वाकडं केलं नव्हतं. पण का कोण जाणे, माझ्या वागण्यात एक परकेपणा आता त्यालाही जाणवू लागला होता. आणि कदाचित पुढे काय होईल याचीही चाहूलही लागली असावी. कारण आता मला तो अजून जास्त contact करू पाहत होता.

मला त्याचं असं काही विशेष tension नव्हतं, असून असून तो UK मध्ये, करून करून काय करेल म्हणून मी जास्त फिकीर केली नाही. याच वेळात मी आईची आणि धीरज ची ओळख करून दिली, आईला किती आनंद झाला मी सांगू शकत नाही, आता मात्र लेक दूर जात नाही याचं समाधान तिच्या चेहऱ्यावर होतं आणि हीच गोष्ट तिला पुरून उरणारी होती.



अंकित च्या घरून phone येत होते. पण मी ते टाळत होते. अंकितचा phone येऊन गेला. पण मला आता त्याचीही फिकीर नव्हती. मला फक्त हवा होता तो धीरज. आणि आताशी मला अंकितचे पाश तोडायची प्रखरता जाणवू लागली. शक्य तितक्या लवकर मला हे करायचं आणि मग मात्र मी धीरजशी लग्न करायला मोकळी.

मला कळत होतं कि मी अंकित सोबत चुकीचं करत आहे, माझं वागणं मॉरली चुकत आहे. पण आपण मात्र स्वतःला कोणत्याही तऱ्हेनं फसवतो. मीही तेच केलं. अन स्वतःचं समर्थन म्हणून स्वतःशीच बोलली "का? मला खुश राहण्याचा अधिकार नाही?"

मग लग्न मोडण्याचं कारण काय काढणार होते? त्यांना माहित होतंच की माझ्या आईला अंकितचं असं बाहेर राहणं आवडत नाही. मग झालं! तेवढं एक कारण बस्स होतं! आणि लगेचच मी माझा नकार त्यांना कळवला. आणि माझी बाजू चांगली व्हावी म्हणून सांगितले आई तयारच होत नाही लग्नाला. आता मी काय करू? तिची मर्जी मोडणं मला नाही जमायचं. शेवटी आई आहे ती माझी.

तिकडून ४-२ शब्दांची देवाण घेवाण झाली, अगदी विनवणी पासून ते अरेरावीपर्यंत सगळ्याच गोष्टी आल्या. पण आता माझी सूत्रे मी माझ्या हाती घेतली होती. नाही ते नाहीच. कधी रागाने, तर कधी आर्जवाने.. पण माझे मत मी मांडलेच. अगदी ठाम.



त्यांच्या विनवण्या कमी कमी होत होत मग बंदच झाल्या. अंकितचा phone तेवढा चालू होता. मी त्यालाही सांगितलं कि तू आता मला यापुढं कधीही phone करू नको. माझा तर फक्त एक मिनिटाचा खेळ होता. पण अंकित मात्र माझ्या प्रेमात आकंठ बुडाला होता. अंकितला मी शेवटचं सांगितलं कि या नंतर Phone करू नको. आणि तसंच झालं, त्याने कधीच परत phone केला नाही किंवा शब्दाने विचारले सुद्धा नाही.

त्याच्या आईने मात्र मला एकदा phone केल्याचं आठवते. ती मला सांगत होती "ऐकून तरी घे ग.. तुला नाही मिळणार अंकित पेक्ष्या चांगला मुलगा". पण मला अंकितपेक्षा चांगला मुलगा कुठे हवा होता? मला तर धीरज हवा होता.

मी कोणाच्याही विनंतीला भीक घातली नाही. समजावणीला बळी पडले नाही. आणि माझ्या आणि धीरजच्या भेटी गाठी मात्र चालूच राहिल्या. पण जे व्हायचा ते झालंच. कदाचित मी केलेल्या गुन्ह्याची शिक्षा म्हणून कि काय, मला उशिरा का होईना, पण समजून चुकलं होते कि धीरजने आपल्याला फसवलं, आणि आपल्या व्यतिरिक्त अजूनही बऱ्याच मुलींशी त्याचे affairs आहेत.







मला तर काही कळायला मार्गच नव्हता. धीरज मला समजावणीच्या स्वरात सांगत होता कि हो मी चुकलो, पण माझं तुझ्यावर खरंच प्रेम आहे, मी हे सगळं सोडतो, मला तू आवडतेस... पण आता मला त्याचा खोटारडेपणा त्याचा विनंतीतसुद्धा दिसत होता. तो खोटारडा तर होताच पण नीच प्रवृत्तीचा सुद्धा होता. आणि त्याची हि सवय काही जाणारी नव्हती. त्याला ती तशी सवय जडली होती. एख्याद्या नशे प्रमाणे त्याला मजा यायची या सगळया गोष्टीत. आणि हि गोष्ट तो एका challange प्रमाणे घ्यायचा. मला व्यवहार कळत नसेल. पण मूर्ख तर मी खासच नव्हते. मला समजत होतं. धीरज नालायक माणसात गणना होण्यासारखा होता. माझ्या व्यतिरिक्त त्याचे अजून बऱ्याच मुलिंशी सबंध होते, बोलणंच काय अगदी फिरणं आणि पुढे सुद्धा... मी कसं सहन करणार? म्हणून उशिरा का होईना पण माझ्या रागिट स्वभावाने जे करायचा ते केलं.

आणि मी ठरवलं धिरजचा निरोप घ्यायचा. तोही कायमचा. मी एकदम फ़ुलस्टॉप दिला. बस.

त्याने मला समजवायचा प्रयत्न केला पण माझ्या मनात एक मात्र होतं जो पुन्हा पुन्हा चुकतो त्याला चुकण्याची सवय होते आणि धीरज अगदी त्याच प्रवृत्तीच नीच मुलगा होता



आता मात्र मला अंकित ची आठवण यायला लागली होती पण मी कोणत्या नाकाने त्याला phone करू? माझी लायकी होती का?? मला स्वतःला अपराधी पणाची भावना बोचत होती. आणि म्हणूनच मी त्याला पुन्हा contact करण्याची कल्पना सोडून दिली.

आणि मी सांगणार काय होते? माझ्या आईचं मन बदललं म्हणून? अचानक काय झालं?... मी तो विचार पूर्णपणे सोडून दिला.

दोन-अडीच वर्षाचा काळ लोटला. मी अंकित ला विसरून गेले. माझं लग्नही दुसऱ्याच मुलाशी ठरलं आणि अगदी २ महिन्यानंतर माझं लग्न होणार होतं आणि अचानक कसं काय ते माहित नाही पण अंकितचा message आला "hii, whats up !!ओळखलं का मला??" फोटो बघितल्या बघितल्याचं मला अंकित आठवला आणि त्याचा असा अनपेक्षित पणे message. मला केवढं छान वाटलं त्याच्याशी बोलून..

पहिले काही तास मी त्याचाशी नुसती “sorrry मला माफ कर, आईला पण सॉरी सांग आणि घरच्यांची विचारपूस” फक्त एवढंच चालू होतं. तो मला राहून राहून सांगत होता कि काही बिघडलं नाही. आणि त्याला माझ्याविषयी काहीच



तक्रारही नाही. पण मला तर होतीच न, आणि आता हा असा अनपेक्षितपणे का आला?? पण काहीहि असो माझ्यात बराच बदल झाला होता. एक maturity आली होती, चांगलं वाईट समजत होतं. ते आधीहि समजत होतं पण आता मात्र त्याला शहाणपणाची एक किनार आली होती.

अंकितच्या माझ्याविषयीच्या भावना जरा सुद्धा बदलल्या नव्हत्या. आणि अजूनही त्याला माझ्या विषयी आसक्ती होती. तो अजूनही माझी वाट पाहत होता. पण माझं आता मात्र लग्न ठरलं होतं. मी त्याला अगदी सहज सांगितलं कि तू पण आता पुढे जा माझी वाट बघु नकोस, आपला प्रवास सोबत नव्हताच.. तो काय बोलणार आणि बोलला असता तरी मी ऐकलं असता का? असो! मी त्याला सांगितलं कि माझं लग्न ठरलं आहे आणि पुढच्या दोन महिन्यात लग्न आहे, तू ये आठवणीने.

त्याने लगेचच होकार दिला आणि मागाहून मला एक गोष्ट समजली कि तो आता इंडिया मध्ये आहे आणि इथे राहणार आहे.. त्याचे आता रोजच विडिओ कॉल चालू झाले, रोज त्याचे message आणि Voice calls मला कुठेतरी हि गोष्ट बोचत होती. पण मागे केलेल्या गुन्ह्याची परतफेड म्हणूनच कि काय मी त्याच्याशी बोलत राहिली कधीकधी whatsaap वर एकदा kissing smily पण पाठवला असेल. पण मग एक समज आली कि काहीही झालं तरी हे चुकीच आहे. आणि मला





हे थांबवायला हवं, कदाचित पुन्हा एकदा तो गुंतला तर आणि मी काय कमी वाईट केलं त्याच्यासोबत? पुन्हा एकदा?? नाही..

मी त्याला समजावलं कि तुझ्या आईला हे आवडणार नाही कारण तिला माहित आहे कि माझं लग्न ठरलं आणि तिचा गैरसमज होईल कि मी अजूनही तुला सोडू पाहत नाही

अंकितने मला समजावण्याचा प्रयत्न केला. एवढंच काय, तर त्याने त्याच्या आई सोबत माझं बोलणंहि करवून दिलं. त्याचे बाबासुद्धा आपुलकीने बोलले. कोणाच्या मनात काहीही अढी नव्हती. पण माझ्या मनात मात्र होती, माझं मन मात्र साक्ष देत नव्हता, नाही - नाही, माझा नाही चा पाढा चालूच राहिला

मी विडिओ कॉल नाही करणार, तू तुझं लग्न ठरव.. तो मला राहून राहून सांगत होता कि माझ्या लग्नाची काळजी करू नको. मी करेलच आज नाही तर उद्या. पण तू माझ्याशी बोलणं सोडू नको. प्लीज, प्लीज, प्लीज. या आधीही मी एकदा तुला हरवून बसलो. पुन्हा हिम्मत नाही. असा मला विनवण्या करत होता. त्याला अजूनही हेच वाटत होतं कि आई ने नकार दिला म्हणून आमचं लग्न झालं नाही. पण खरी हकीकत सांगण्याची माझी हिंमत होत नव्हती. आणि म्हणूनच कि काय, मी त्याला कायम अंधारातच ठेवलं.



त्याने मला एक विनवणी केली कि त्याच्या लग्नाच्या १ दिवस आधी यायचं... अशी तर फार काही मोठी मागणी नव्हती म्हणून मी होकार दिला

२ महिने कसे गेले कोणास ठाऊक. पण ठरल्याप्रमाणे माझं लग्न झालं, अंकितने सहकुटुंब लग्नाला हजेरी लावली होती,. माझ्या आईचं आणि त्याच्या आईचं काय बोलणं झालं ते त्यांनाच माहित. पण काहीतरी खास झालं होतं हे मात्र नक्की. मी कधीच आईला विचारणार नव्हती.

Congratulate करायसाठी अंकित स्टेज वर आला. मी, माझ्या नवरा, सगळ्या पाहुण्यांचे हसतमुखाने स्वागत करीत होतो, तो कधी स्टेजवर आला कळलंच नाही. एकमेकांना समोरा - समोर बघण्याची हि माझी पहिलीच वेळ आणि त्याची सुद्धा. तो फारच देखणा, उंच, गोरा असा होता. माझ्या चेहऱ्यावर स्मित हास्य आलं. त्यांनी माझ्या जवळ येऊन मला विचारलं "ओळखलं "??" मी हसून “अर्थातच” म्हटलं आणि लगेच माझ्या नवऱ्याची आणि त्याची ओळख करून दिली बालपणीचा मित्र म्हणून.

इकडे पाहुण्यांची बरीच वर्दळ होती. त्यामुळे मला काही फार बोलता आलं नाही, त्याचं कुटुंब माझ्यापुढे आलं. मी हलकेच सॉरी बोलून सर्वांच्या पाया



पडले. आणि एक तिरपा कटाक्ष अंकित वर टाकला. तो अजूनही मला बघत होता. कदाचित मला किंवा नशिबाला दोष देत असेल.

एक मात्र नक्की होतं कि त्याचं माझ्यावर अगदी जीवापाड प्रेम होतं, मला गोष्टी समजत होत्या. पण कधीकधी गोष्टी दुर्लक्ष्य केलेल्या बऱ्या. म्हणून मी तेवढा विचार केला नाही.

आमचा संसार सुरळीत चालला होता. आम्ही हनिमून ला गेलो, पण अंकितचे सततचे message मला खटकत होते. एक - दोनदा नव्हे तर हजारदा तरी माझ्या नवऱ्याने त्याचे message बघितले असतील. पण का कोण जाणे त्याने मला शब्दाने सुद्धा विचारले नाही कि हा एवढा तुला message का करतो?

पण मीच आता अंकितला खोटंच सांगितलं कि तुझ्यामुळे आमच्या नवरा बायको मद्धे खटके उडायला लागले. तरी pls मला message करू नकोस. जर वाटलंच तर मी स्वतः तुला phone करिन. माझी एवढी गोष्ट मान्य कर..

तो काही माझ्या शब्दांपलीकडे नव्हताच. आणि बस्स झालं. त्यानंतरचा आमचा जर काही contact झाला तर तो फक्त माझ्याकडूनच.



मधेच कधीतरी त्याचा mesage आला. या वेळी माझा message नवऱ्याने बघितला. पण सुदैवानी त्याने त्याच्या लग्नाची पत्रिका पाठवली होती. मी मनोमन देवाचे आभार मानले. आणि काही सेकंदच का होईना पण मला वाटले कि माझ्या नवऱ्याच्या डोळयात जी एक शंका होती ती आता नाही आहे.

लग्न अगदी एका आठवड्यानंतर होतं. अहमदाबादला. आणि त्याने पुढें लिहिलं होतं एका दिवस आधी ये मैत्रिणीसारखी, वेळेवर नको औपचारिकता म्हणून... मी लगेच होकार दिला.

नवऱ्याला विचारलं. पण त्याला ऑफिसच्या कामासाठी म्हणून Texas ला जायचं होतं. म्हणजे आता मला एकटीनेच जायला भाग होतं.

७ डिसेंबर, रविवार, सुट्टीचा दिवस. मी लगेचच ६ डिसेंबर ची flight बुक केली. पण लग्नघरी सोय होत नाही. म्हणून मी माझ्यासाठी हॉटेलची बुकिंग केली. नवऱ्याची आणि माझी बॅग पॅक करून आम्ही दोघेही आपापल्या दिशेला गेलो





"काळजी घे" अवी बोलला, मी उत्तर दिलं - तुम्हीसुद्धा... स्मितहास्य करत आम्ही एकमेकांचं निरोप घेतला.





मी अहमदाबादला पोहोचल्यावर त्याला सांगितलं नाही... का कोण जाणे पण मला सांगावं वाटलं नाही, त्याच्या कार्ड वर address होताच मी थेट हॉटेल मध्ये बॅग्स ठेवून वॉश घेतला. चहा आणि पाणी रूममध्येच मागवला एव्हाना खाली कॅब आली होती. तयारी करून मी त्याच्या घरी पोहचली,

घर खूप सुंदर सजवलं होतं, बाहेरच मला त्याची आई दिसली. मी पाय पडल्या मला उठवत त्या म्हणाल्या “अगं एकटीच आलीस कि काय? जावई कुठे आहेत? आणि bags?? का नुसतंच हात हलवत आलीस?”

“नाही हो. “- मी उत्तर दिले “सगळं आहे, हॉटेल मधेच ठेवलं..

“हॉटेल म्हणजे?? तुला काय वाटलं आम्ही सोय नाही करणार का तुझी?”

“तसं नव्हे. हेच बोलले कि लग्नाचं घर, कशाला कोणाला त्रास देतेस..”

त्याच्या आईला मात्र ते पटण्यासारखं नव्हतं. पण काहीतरी विचार करत ती बोलली “बरं जाऊ दे, तू आत ये ते बघु अंकितच हळदीचा कार्यक्रम चालू होणारच आहे थोड्या वेळात, जा तू भेटून ये.”



मी हो बोलले पण भेटायला काही गेली नाही

बाहेर साक्षी आणि अक्षय होते (अंकितचे भाऊ - बहीण ) त्या दोघांनाही मी आवडत नव्हते. कारणही तसचं होतं त्यांना तरी दोष कसा द्यायचा.

फक्त औपचारिकता म्हणून दोघांनी हाय हॅलो तेवढ्यावरच संपवलं.

मी मात्र timepass म्हणून त्यांच्या घराचा आढावेढा घेत होते, मंडप decoration, lightings ह्या सगळ्यांकडे माझं लक्ष होतं, अंकितला एवढ्यातच भेटायची माझी इच्छा नव्हती. मनातून मी कशाला तरी घाबरत होती काय ते माहित नाही. पण मला मनोमन असा वाटू लागलं कि एकदा का अंकित हा कामात गुंतला कि मगच आपण त्याला भेटायचं. आणि तेव्हापर्यंत त्याला चाहूल सुद्धा लागू द्यायची नाही कि आपण येथे आलो आहोत त्याची.

मी चोरून त्याच्याकडे बघत होते आणि मला जाणवलं कि कोणाची तरी वाट बघत आहे, कोणाची असेल? माझी?

कोणास ठाऊक कदाचित त्याच्या आईने सांगितलं सुद्धा असेल मी आली ते, पण खात्री कशाला करायची म्हणून मी आपली जागची हालली नाही. आणि मग हळदीचा कार्यक्रम चालू झाला



मी आता हळूहळू त्याच्या दिशेने येत होते. त्याच्या चेहऱ्यावर केवढं मोठं हास्य आलं, मला बघून तो फारच खुश झाला, एवढं कि जर त्याच्या हातात असतं तर तो उठून उभाच झाला असता. मी त्याच्या जवळ गेली. बाहेर ढोल वाजत होता, लोकांच्या गप्पा, बऱ्याच गोष्टी रंगात आल्या होत्या. सगळा माहौल रंगारंग झाला होता. पण अंकितला मात्र जगातल्या कसल्याच गोष्टींची शुद्धच नव्हती. त्याला फ़क्त मी दिसत होते. फ़क्त मी.

मी सहज हळद हातात घेतली त्याला लावायला गेले. का कोण जाणे त्याने माझा हाथ घट्ट पकडला, काहीच समजायला जागा नव्हती हा असा का वागतो. याचं स्पष्टीकरण माझ्याकडे नव्हतं. माझा हाथ पकडून त्याने त्याच्या छातीवर टेकवला काही समजायला पर्याय नव्हता.. त्याचा स्पर्श, त्याची ३ वर्षांची तपस्या होती. त्या स्पर्शात एक आसक्ती होती. मला तर ती समजत होतीच. पण बाकीच्यांनाही ती समजल्या वाचून राहिली नाही. एव्हाना लोकांची बोलणी थांबली होती. मला असा भास होत होता कि सर्वे जण आमच्याकडे रोखून पाहत आहेत. मी बधिर झाली होती. आपला हाथ सोडवून घेण्याची निरर्थक धडपड करत होती.

शेवटी त्याची आई जवळ आली. काही झालेच नाही अश्या ओघात ती मला बोलली "जेवून घे ग लवकर. तुला उशीर होईल". अंकित भानावर आला, माझ्या हातावरची पकड आताशी सैल झाली होती. मी हाथ मागे खेचला. आणि स्मित हास्य करत निघून गेली.

सर्व जण माझ्या दिशेने रोखून पाहत होते. त्याला कारणही तसंच होतं. मी काय बोलणार? मी तर अदृश्य व्हावं अशी प्रार्थना करत होते.



आणि जर का त्याची आई मध्ये अली नसती तर काय? विचार करूनही काटा उभा राहतो. एक वेळ मनात विचार आला. बरंच झालं अवी इथे नाही. त्याने असं काही बघितलं असतं तर त्याला मी काय उत्तर देणार होते?

कसं - बसं जेवण आटोपून मी निघायच्या घाईत होते, निरोप म्हणून मी आईला भेटायला आले "उद्या येते मी सकाळी. आता निघते " अगं आताशी अंधार पडायला लागला " अनोळखी शहर तू कशी जाणार?"

“अहो हि काय कॅब केली, लगेच जाईल कि, तुम्ही काळजी नका करू”

तुमची हि technology, आमच्या लक्ष्यात नाही येत, एक खोटा राग आणून अंकितचती आई बोलत होती

“तू थांब बघू हा अक्षय येईल तुला सोडायला.” मला त्यांनी जाऊ दिलंच नसतं, माझा नाईलाज झाला, मी कॅब Cancel केली, आम्ही बोलत असतांनाच अंकित तिथे पोहोचला.

"काय गोष्टी चालल्या?"

"काही नाही" त्याची आई पुढे होत बोलली "जायचं म्हणते. म्हणून म्हटलं कि अक्षय सोडून देईल"

"जायचं म्हणजे कुठे" - अंकितचा सहज आवाजातला प्रश्न.

"अरे तिने हॉटेल बुक केलं आहे."

"का??" अंकित धक्का लागल्यासारखा विचारत होता.

"का? तुला वाटलं कि आम्ही तुझी सोय करणार नाही?"

"तसं नव्हे, यांनीच बुकिंग करून दिली " मी बोलले

ओहो !!, म्हणजे अवी पण आला कि काय?

मला राहून राहून वाटत होता कि हो आला असं सांगावं. पण त्याची आई पुढेच होती, मी कशी खोटं बोलणार? सगळं काय ते खरं सांगितलं.

मग आता कशी जाणार त्याचा प्रश्न?

मी काही बोलायच्या आतच त्याच्या आईने उत्तर दिला "अक्षय जात आहे कि सोडायला"

का? मी जातो कि.

मला ते नको होतं. अर्थात त्याच्या आईला सुद्धा, आम्ही असतील नसतील ती सगळी कारणं पुढे केली.

आई बोलली, अरे तुला हळद लागली, असं हळदीच्या अंगांनी बाहेर जाणं बरोबर नाही.



पण एक नाही आणि दोन नाही, अंकित अगदी अडून बसला कि तोच येईल सोडायला.

आम्ही सगळे समजावून - समजावून थकलो. पण तो ऐकायला तयार नव्हता. शेवटी माझा आणि आईचा नाईलाज झाला. शेवटी आईला हार पत्करावी लागली. आता बोलण्यासारखं काय होतं?? आई तरीही जाता जाता बोलली "जवळच आहे hotel ये तासाभरात परत.” तो काही ऐकायच्या तयारीत नव्हता त्याने लगेच पार्किंग मधून कार काढली आणि आमचा रिटर्न चा प्रवास चालू झाला. मला अजूनही अनामिक भीती वाटत होती

कदाचित त्याच्या मनात काय चालू आहे याची चाहूल मला लागली होती

काहीकाही कारण काढून मी त्याच्याशी त्याच्या होणाऱ्या बायको विषयी बोलत होती. पण का कोण जाणे तो प्रत्येक वेळी विषय कसाही फिरवून आमच्यावरच येत होता.. त्याचा बोलण्यात एक तक्रार होती, माझ्याविषयी, कि मी अशी का वागली? का मी त्याला होकार का दिला नाही? मला सगळं समजून मी न समजल्यासारखं त्याला, हो ते हो, नाही ते नाही, एवढंच उत्तर दिलं

आता गाडी माझ्या हॉटेलच्या पार्किंगपाशी थांबली.



बस्स.. आलं एकदाचं हॉटेल आता. आणखी काहीहि नको... मनाशीच विचार चालू होता, मी लगेच गाडीतून खाली उतरली, बाय म्हणू मी निघाली.

त्याने मला आवाज दिला "खूप घाई आहे का तुला जायची?"

त्याचा अपेक्षित असा प्रश्न, "तसं नाही रे, तुला उशीर होईल तुला बरीच काम असतील ना? तुझ लग्न आहे उद्या.. माझं काय उद्या येईल कि तुझ्या लग्नाला तू एकदा फ्री झाला कि ये मुंबईला, तुझ्या बायकोला घेऊन, मग काय वेळच वेळ "

हम्म्म, फक्त एवढंच त्याचा उत्तर आलं, आणि मला तेवढं पुरेसं होतं मी कशाचाही विचार न करता थेट वर आली. दार बंद करून, कोचावर बसली.

का कोण जाणे, पण मनातल्या भीतीला आता एक धार आली होती. अचानक दारावर टक - टक वाजली मला एव्हाना चाहूल लागली होती कि बाहेर कोण असणार.

मी दार उघडला. अपेक्षेप्रमाणे अंकित होता. त्याच्या चेहऱ्यावर अस्वस्थ हसू होतं आणि तो एक्साईटमेंटने थर्थरत होता.

का, काही राहिलं का?? माझा अनपेक्षित प्रश्न

नाही? त्याचा उत्तर आलं.





मग तू गेला नाहीस?

मला, मला थोडं पाणी हवं होतं, तो गोंधळून सांगत होता.

एव्हाना माझ्या लक्ष्यात आलं होतं त्याच कारण अगदीच बोथट आहे आणि पाणीच हवं होतं तर हा हॉटेलच्या reception वर पण मागू शकत होता.

त्याला काय हवं होतं? पाणी? ते तर खासच नाही.

मी त्याला बाहेरच उभा करून पाणी आणायसाठी बेडरुमच्या दिशेने वळली.

त्याला माझ्या परवानगीची गरज नव्हती, तो आत आला थेट bedroom च्या दिशेनी आला. मला समजत होता कि तो आला आहे.

मी काही न समजून त्याच्या पुढे पाण्याचा ग्लास दिला.

फक्त घोटभरच कि काय त्याने पाणि पिले आणि ग्लास टीपॉयवर ठेवून तो अगदी फिकीर नसल्यासारखा बसला.



एव्हाना माझ्या हृदयातली धडधड प्रचंड वाढली होती. पण का कोन जाणे मला कळत नव्हतं की मला भिती वाटते आहे की इतर काही. मी आतून खुप गोंधळले होते. वरवर मात्र मी अगदी नॉर्मल आवाजात बोलले...

बसतोस काय? जा, तुला उशीर होईल.

बसू दे ग, मला बोलायचं आहे तुझ्याशी,

मग आपण नंतर बोलू.

तुला मला पळवायची एवढी काय घाई झाली? जाईल कि आरामात. कदाचित पुन्हा भेटशील.. नाही भेटणार आपण...

यावर मी काय बोलणार? माझा श्वास जलद होऊ लागला होता.

“बरं! एक मागू तुझ्याकडे??” त्याचा अनपेक्षित प्रश्न.

“काय??” माझा आवाज एव्हाना घोगरट झाला होता.

“एक hug करू तुला? प्लीज...”

२ मिनिटं अगदीच शांत होतं सगळं.

माझ्या शांतपणाचा काय तो अर्थ घेऊन तो पुढे आला. त्याच्या हळदिव्या अंगाचा गंध, उटण्याची आर्तता अणि पर्फ़्युमची आसक्ती माझ्या रंध्रांत हलकेच उतरली.



मी अगदीच निश्चल अशी उभी होते, एखाद्या पुतळ्यासारखी, पण त्याला मात्र तेवढा मूक होकार पुरेसा होता.

अगदी त्याचा श्वासात आणि स्पर्शात त्याची माझ्याविषयीची आसक्ती दिसत होती. त्याने ३ वर्षात केलेली तपस्या, त्याची असोशी, त्याची तहान, सर्वच मला दिसत होती. त्याची हपापलेली बोटे माझ्या खांद्यावरून आणि पाठीवरून फिरत होती. त्याचा स्पर्श एकदम हळुवार होता, एखाद्या मोरपिसासारखा. एव्हाना मी पण डोळे मिटून घेतले होते. पण अजूनहि जाणीवा मात्र गेलेल्या नव्हत्या. कधीतरी त्याने हळुवार हातांनी माझे केस मागे केले आणि हलकेच त्याच्या ओठांचा ओलसर गार स्पर्श माझ्या मानेवर झाला. आणि त्याचा गरम श्वास मला जाणवला.

कोहीतरी भयाण झाल्यासारखं मी त्याला मागे लोटलं.

मी भानावर आले होते, आता मला अपराधीपणाची भावना बोचत होती.

त्याच्याशी नजर मिळवायची हिम्मत होत नव्हती, मी त्याच्याकडे पाठ फिरवली, हातांची घट्ट जुडी करून एक हात मानेवर ठेवलं मी उसनं अवसान आणून बोलली "तू जा बघू"

शब्दांत आज्ञा होती. पण स्वरात, आवाजात जरब नव्हती. पण तो मानेल का? माझं मन साशंक होतं.



मी जरी त्याला पाठमोरी असली तरी मला माझ्या पुढच्या खिडकीच्या काचेतून तो मला स्पष्ट दिसत होता. तो तसूभरही हलला नव्हता. न मागे. न पुढे.

त्याच्या नजरेला नजर द्यायची माझी हिम्मत होत नव्हती.

तो विनवणीच्या स्वरात बोलला.. "सिपी, सिपी...आजपर्यंत मी खूपदा तुझा सहवास भोगला, पण फक्त स्वप्नात, मला कमीत कमी एकदा तरी जाणवू दे.. स्वप्न चांगलं कि सत्य. सिपी प्लीज... प्लीज"

त्याची मागणी मला फारच विचित्र वाटली, होतीही तशीच, पण मी जागची हलले नव्हते, पण आता समोरच्या खिडकीवरचा देखावा बदलत होता. तो हळू हळू माझ्या दिशेनी येत होता मला एव्हाना जाणवला होता कि आता यापुढे काय होणार आहे. पण का कोण जाणे, मी अगदी पुतळयासारखी उभी होते. जागेवर. मूक.

मी डोळे घट्ट मिटून घेतले. किती दूर असेल तो ५-७ पाऊले.. एवढ्या वेळात तो माझ्या जवळ यायला हवा होता. गेला असेल का तो? खरंच गेला की काय तो?



मी डोळे उघडून बघू का??

मला नाना शंका कुशंका येताच होत्या. पण माझे मन मात्र घट्ट होते मी डोळे उघडले नाही.

मला वाटत होते कि तो येईल आणि त्याच्या हाताचा हार माझ्या कमरेभोवती टाकेल. मला घट्ट धरेल. नुसत्या कल्पनेनेच मी थर्थरत होते. माझे ओठ कापत होते. माझा श्वास धापानीं येत होता.. गात्रे बंद झाली होती.. फ़क्त हळदीच्या उटण्याचा पागल करणारा गंध मला लपेटून घेत होता... त्याच्या गंधांने माझ्या उरल्यासुरल्या नकाराचा निरास केला होता.

आणि एका अबोल क्षणी मला त्याचा हळुवार स्पर्श जाणवला. त्याच्या बोटांचा. माझ्या केसांमध्ये. ते हळूच त्याने मागे नेले आणि माझ्या मानेवर त्याने हळूच त्याचे ओठ टेकवले.

माझं शरीर गरम झालं होतं, कानशिलं गरम होऊन गुलाबी झाले असावेत. माझा तोल जात होता. आणि त्यावर माझा काहीच प्रतिकार नव्हता.

कुठेतरी माहित होतं, कळत होतं... हे चूक आहे. पण मला आता निसर्गाच्या प्रवाहाविरुद्ध पोहण्याची इच्छा नव्हती, व तयारीही नव्हती. माझा विरोध आता दुबळा झाला होता. मी माझा ताबा त्याला द्यायला तयार झाले होते. मला ते हवंहवंसं वाटत होतं की काय?





माझ्या अंगावरचा स्वेटर त्याने हळूच ओढला. तो अलगद खाली आला.. आतमध्ये मी इलास्टिकची नेक असलेला टॉप घातला होता. तो ओढून काढायला त्याला अजिबात कष्ट पडले नाहीत. आता माझ्या inner चा बेल्ट बाहेर डोकावू पाहत होता. आणि त्याला कदाचित खुणावतहि होता, तोसुद्धा कधीतरी खाली आला. कधी?? कळलेच नाही. एक एक वस्त्र गळून पडलं तसा माझा विरोधही संपला.

आता मात्र त्याच्या प्रेमात एक वासनाही मला जाणवत होती. पण का असू नये? शेवटी प्रेमाला कुठेतरी वासनांची झालर असतेच कि. आता त्याचे स्पर्श हळूवार नव्हते. वखवख नसली तरी काहीसा हावरट स्पर्श मला जाणवू लागला होता.

ओढतच त्याने मला कॉटपाशी नेले. मला बेडवर ढकलून त्यांनी माझ्यावर झेप घेतली. खरं तर त्याने ढकलण्यापुर्वीच मी स्वतःला बेडवर पसरलं. तेवढ्या वेळात एकदाच माझी नजर त्याच्यावर गेली. खूप दिवसांच्या तपस्येने काहीतरी मिळवल्याचं समाधान त्याच्या चेहऱ्यावर होतं. त्या मड प्रकाशातही त्याचा चेहरा उजळला होता.

माझे वक्षस्थळ आता त्याला मोकळे होते. कितीतरी वेळ तो हातांनीच त्याला कुरवाळत बसला, कधी हळूच पण कधी तरी एकदम जोरात, अगदी कळ येई पर्यंत तो कुरवाळत होता. आणि आता तो मात्र त्यांना तोंडात घेऊन स्वैर मजा लुटत होता, पण एक हात मात्र दुसऱ्या वक्षावर होता जणू काही तो माझ्यावरचा





ताबा सोडायला तयार नव्हता. त्याला काही अमूल्य मिळालं होतं. आणि ते त्याने घट्ट धरून ठेवलं होतं.

मी त्याच्यापुढे अगदीच तोकड्या कपड्यात होते. वरचे अंग तर काहीच झाकले नव्हते. अर्धी तर विवस्त्र होतेच. पण खाली leggin तेवढा बाकी होता. पण त्यालाहि गळून पडायला कितीसा वेळ लागणार होता?? हा विचार डोक्यात येई येईपर्यंत अंकितचे हाथ माझ्या पोटावरनं खाली सरकत होते. आताशी मला त्याच्या उबदार हातांच्या स्पर्शाची चाहूल लागली होती.. माझ्या योनीवर त्याचा हाथ अधिकाराने फिरत होता. स्पर्शानेच तो सगळं बघत होता, जाणीव करून घेत होता. जणू काही अंधारात दार चाचपडत शोधावं अगदी तसं. त्याचा स्पर्श मला होत होता. कधीतरी त्याच्यातल्या पुरुषाचीहि जाणीव झाली.. त्याचा स्पर्श कोठेही होत होता. तो अगदी तयार आहे हे कळायला मला उशीर नाही लागला.

माझ्या योनीचा गरम स्पर्श त्याला झाला असावा. कारण तो अजून जास्त पेटला होता. त्याचा घोडा आता चौखुर उधळू लागला होता. मला कळत होतं याचा शेवट काय होणार.. मी माझ्यातला मी पण हरवून बसली होती. काय सुचणार? आणि कोण सुचवणार? तो? अंकित? एवढे वर्ष ज्यानी या एका गोष्टीसाठी वाट बघितली?? कि मी?? स्वतःला त्याच्या स्वाधीन केलेली?? संपूर्ण स्वाधीन.



का? कसं? कोण जाणे? का म्हणून, पण अचानक phone वाजला. ringtone एवढी कर्कश होती कि कलेवर सुद्धा जिवंत होईल. मग आम्ही तर फक्त भावनेच्या आहारी गेलेली माणसे होतो. मी भानावर आले. आणि त्याला मागे ढकलले. पण तो आता पुरता अनावर झाला होता. काही न समजून तो त्याच लयीत पुन्हा गुंतत होता. पण माझं मन मात्र आता तयार होत नव्हतं. मी सावरायला लागले होते. पुन्हा त्याचा फ़ोन वाजला... खवळलेल्या त्याने तो तसाच भिंतीवर आपटला. त्याला आता अनावर राग आला होता.

त्याला जे हवं होता ते अगदी जवळ येऊन तो त्याला मुकला होता, त्याचा राग साहजिक होता. तो काही बोलेल एवढ्यात माझा फोन वाजला. त्याची आई फोनवर होती.

“अंकित निघाला का?”

“अ, हो... हो.. क...कधीचाच, एवढ्यात, एवढ्यात येईल कि.” माझ्या आवाजात कंप आला होता. पुन्हा चार दोन शब्दांची देवाण घेवाण होऊन मी फ़ोन बंद केला. पण अंकित मात्र अजून तसाच निश्चल होता. पण आता मला काही तरी करणे गरजेचं होतं. मी अंगावर चादर ओढून माझे कपडे उचलून थेट बाथरूम च्या दिशेने पळत सुटले.



बाहेर आल्यावर मी ओढतच त्याला दाराबाहेर ढकललं. आणि “जा” म्हणून सांगितलं. तो काही ऐकायला तयार नव्हता. पण मी दार आतून बंद केलं. आणि तशीच दाराजवळ उभी राहून बाहेरचा अंदाज घेत होते. मला जाणवलं. खूप वेळ गेला तरी तो तसाच दाराजवळ उभा असावा. कारण एवढ्यात पावलांचा जरा सुद्धा आवाज झाला नव्हता. पण मी काही दार उघडणार नव्हते किंवा त्याला काही खुणाही देणार नव्हते.

२०-२५ मिनिटांनी मला दाराबाहेर पावलांचा आवाज आला

मी उद्या वाट बघेल, बाहेरून अंकितचा आवाज आला, आता मात्र माझे मन धजत नव्हते. तो गेला याची खात्री केल्यानंतर मी लगेच मिळेल ती flight पकडून मुंबई गाठली.

मला आता कशाचीही फिकीर नव्हती व पर्वाहि नव्हती, काय व्हायचं तर होऊ दे, लग्न होवो अथवा नको होवो मला काय? काहीतरी विपरीत घडायचं राहून गेल होतं.

म्हणजे खरंच काही शिल्लक होतं का? त्याच्यापुढे अश्या अनैसर्गिक अवस्थेत जाणं, माझा ताबा त्याला देणं, अजून काय शिल्लक होतं?? फक्त सेक्स तेवढा? चूक तर घडून गेली होती त्याचा काय?



मी कोणाला स्पष्टीकरण देणार होती? कोण मागायला येणार होतं?

मुंबई ला पोचल्यानंतर मी अंघोळ करून घेतली.. कुठंतरी समाधान येत होतं. अवीची अगदी खूप आठवण आली मी त्याला phone करायला mobile हाती घेतला तर त्याचेच ४ missed calls होते, मी त्याला सांगणार होते का?? अर्थातच नाही, माझी एवढी हिम्मत नव्हती आणि होणारही नव्हती.. शेवटी काही गोष्टी गुप्त असलेल्याच बऱ्या.





# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यांच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे मार्केटिंग करा. एकदम फ़्रंट फ़ुटवर येऊन खेळू. जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.



ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahitya.com

esahity@gmail.com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे. ई साहित्यचं App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ्री वाचा.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service सुरू झाली आहे. पूर्णपणे फुक्कट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट. कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सऍप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा. आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक Whats app द्वारे पाठवले जाईल. आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवा. त्यांना आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू. व आपल्याला VIP सभासद बनवले जाईल.